# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ/नाशिक/व्दितीय अपिल क्र. १०७५/२०२१/नाशिक

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. अशोन मदन प्रकाशकर,<br>रा. १८, पटेलवाडी, कोरीट रोड,<br>नंदुरबार, ता. जि. नंदुरबार. | वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),<br>वन परिक्षेत्र अधिकारी चांदवड यांचे कार्यालय, ता. चांदवड, जि. नाशिक. | सहायक वन संरक्षक (वनीकरण व वन्यजीव संरक्षण),<br>मनमाड स्थित चांदवड यांचे कार्यालय, फॉरेस्ट कॉलनी, मनमाड रोड, चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक. |

### व्दितीय अपिल सुनावणी दिनांक – २५/०५/२०२३

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| २१/१०/२०२० | २९/१०/२०२० | ११/११/२०२० | १२/१२/२०२० | १४/१२/२०२० | १२/०२/२०२१ |

अपिलार्थी यांनी दि. ०२/०४/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी उशिराने पत्र पाठविले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्जात त्यांनी "सदर माहिती विनामुल्य तात्काळ मिळावी," अशी विनंती केलेली आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी वगळता इतर पक्षकार उपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"दिनांक ०१/०१/२०१८ ते दिनांक ३०/०९/२०२० या कालावधीतील आपले क्षेत्रास माहवार प्राप्त निधीचे वरिष्ठ कार्यालयास सादर केलेले प्रमाणके, हजेरीपत्रके, बँक पेमेंट याद्या, संपुर्ण रोखालेखे A४ अटेस्टेड प्रतीत शुल्क आकारुन पुरविण्याची विनंती केली होती."

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुचित केले की, मागितलेली माहिती निरीक्षणासाठी उपलब्ध होऊ शकेल, महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ च्या ४ (अ)(ब) अन्वये मागणी केलेले दस्तऐवज अभिलेख्यांच्या निरीक्षणासाठी दिनांक २७/११/२०२० रोजी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तरी वन परिक्षेत्र कार्यालयात चांदवड येथे कार्यालयीन वेळेत माहिती उपलब्ध करुन दिली जाईल, सदरच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहुन अवलोकन करुन माहिती प्राप्त करावी, असे कळविले आहे.

२. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्राप्त प्रथम अपिलाची दिनांक १२/०२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी चांदवड (प्रा.) यांनी अपिलार्थी यांना माहिती अर्जातील नमुद माहितीबाबत अपिलार्थी यांना अवलोकनाची एक संधी उपलब्ध करुन द्यावी तसेच अर्जात नमुद माहितीबाबत अपिलार्थी यांचे समाधान करावे, असा आदेश देऊन प्रथम अपील निकाली काढले आहे.

३. अपिलार्थी यांनी सुचित केले की, सदर कालावधी कोवीड कालावधी असल्याने मी अवलोकनास गेलो नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी मला सदर माहितीचे माहिती शुल्क कळविणे अपेक्षित होते. व्यक्तीश: हजर राहण्याची गरज नव्हती. माहिती पुरविणे आवश्यक होते. मी माहिती शुल्क भरणार होतो. मी शुल्क भरुन माहिती घेण्यास तयार आहे. मला माहिती मिळावी.

४. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहितीचे अवलोकन करण्याबाबत कळविल्याचे स्पष्ट होते. मात्र अपिलार्थी यांनी सदर कालावधी कोवीड कालावधी असल्याने अवलोकनास गेले नसल्याचे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदर माहितीचे माहिती शुल्क कळविणे अपेक्षित असल्याचे आयोगास सांगितले आहे. तसेच ते आता माहिती शुल्क भरुन माहिती घेण्यास तयार असुन त्यांनी आयोगास माहिती मिळण्याची विनंती केली आहे. त्यामुळे आता प्रथम अपिलीय अधिकारी यांचा आदेश कायम करण्यात येत असुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार कार्यवाही करणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.), वन परिक्षेत्र अधिकारी, चांदवड यांनी अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या मुदतीत प्रथम अपिलीय अधिकारी यांचा आदेश कायम करण्यात आला असल्याने जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रतिलिपी- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

उप वनसंरक्षक, पुर्व भाग, नाशिक यांचे कार्यालय, शरणपूर पोलीस चौकीजवळ-४२२००२.

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनांनुसार आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदरचा आदेश सर्व संबंधितांवर बजावून त्याची दिनांकित पोच आयोगास सादर करावी.

---

जावक क्र. आै-१२२०    दि.१८।०८।२०२३

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक